# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**तात्काळ/महत्वाचे**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/२०९५

दिनांक :- 2 JUL 2019

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय / अनुदानित / विना-अनुदानित पदविका /

पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,

**औरंगाबाद विभाग**

**विषय - ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम सन २०१९ पावसाळा...**

संदर्भ १ या कार्यालयाचे पत्र क्र. विकाऔ/२०१८/४६१५ दि.३१/११/२०१८.

२ मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र क्र.जिअकाऔ/मग्रारोहयो-कक्ष-२/कावि/१८/२०९० दि.१९/०६/२०१९.

दिनांक ०१ जुलै २०१९ ते ३० सप्टेंबर २०१९ या काळात महाराष्ट्रात ३३ कोटी वृक्ष लागवड करावयाची असून औरंगाबाद जिल्हयातील तंत्रशिक्षण विभागासाठी वृक्ष लागवडीचे उद्दिष्टे संस्थानिहाय प्रत्येकी ४०० या प्रमाणे देण्यात आलेले आहे. त्यानूसार संबंधित संस्थानी वृक्ष लागवडीची प्रक्रिया चालू केलेली आहे.

विभागात पावसाची सुरवात झालेली असल्याने वृक्ष लागवड कार्यक्रमाच्या प्रक्रियेला संस्थाकडून जोमाने चालना देणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने खालील बाबींची तात्काळ पूर्तता संबंधित संस्थामार्फत करण्यात यावी.

१. वृक्ष लागवड स्थळ निश्चितीची माहिती तात्काळ ऑनलाईन भरणे तसेच खड्डे खोदण्याचे १०० % उद्दिष्टे पूर्ण करणे (सदर उद्दिष्टे दि. ३१/०३/२०१९ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते.)

२. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचा तपशील (तारखेसह) तयार करुन या कार्यालयाला पाठविणे.

३. वृक्ष लागवडीसाठी केलेल्या पूर्वतयारीचा अहवाल या कार्यालयाला पाठविणे.

४. सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का. औरंगाबाद यांच्यातर्फे स्थापित आढावा गटाशी समन्वय साधणे व कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे.

सर्व संस्थांनी वृक्ष लागवडीच्या सर्व स्थळांवर एकूण उद्दिष्टाऐवढे खड्डे प्रत्यक्षात तयार करुन सुस्थितीत ठेवावे तसेच प्रत्यक्ष वृक्ष लागवडीसाठी संस्थेतील कर्मचारी / विद्यार्थ्यी तसेच गावातील नागरीकांच्या सहभागाने कार्यक्रम यशस्वी १०० % पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी. सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का. औरंगाबाद यांनी नेमलेल्या विभागीय आढावा गटा मार्फत संस्थानिहाय सदर वृक्ष लागवड कार्यक्रमाची तपासणी वेळोवेळी करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.